प्रेसनोट दि. १५/०७/२०९

**" विनापरवाना देशी-विदेशी दारुची विक्री करणा-या दुकानावर गुन्हे शाखा युनिट-०४ कडून छापाः२४५१३/-रु.किं.चा दारुच्या बाटल्यांचा साठा जप्त".**

गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक,अब्दुल सय्यद,पोलीस कर्मचारी सुरेंद्र साबळे,रमेश राठोड,रमेश चौधर,निलेश शिवतरे,सागर घोरपडे असे १३/०७/२०१९ रोजी अवैध धंदयावर कारवाई करणेकामी येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना नियंत्रण कक्षामार्फत माहिती मिळाली की,गायत्री इंटरप्रायजेस शेजारी,वडगाव शेजारी या ठिकाणी एक इसम दुकानामध्ये विनापरवाना देशी विदेशी दारुच्या बाटल्यांची विक्री करीत आहे,वगैरे माहिती मिळाल्यानंतर सदर बातमीची खात्री करून वरील पथकाने गायत्री इंटरप्रायजेस लगत असलेल्या एका गाळयामध्ये छापा टाकला असता इसम नामे दत्तात्रय अंकुश चव्हाण,वय-३८,रा.दत्तकृपा हौसिंग सोसायटी,वडगाव शेरी हा स्वतःचे आर्थिक फायदयासाठी विनापरवाना देशी व विदेशी दारुची विक्री करत असताना मिळून आला असून छाप्यामध्ये एकूण २४५१३/-रुपये किंमतीच्या देशी व विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून नमूद इसमाविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा रजि नं-५०१/२०१९ महाराष्ट्र दारू प्रतिबंधक अधिनियम कलम-६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.अशोक मोराळे,मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.शिरीष सरदेशपांडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे-२) श्री.भानुप्रताप बर्गे,मा.पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड,सहाय्यक पोलीस फौजदार अब्दुल सय्यद व पोलीस कर्मचारी सुरेंद्र साबळे,रमेश राठोड,रमेश चौधर,निलेश शिवतरे,सागर घोरपडे यांचे पथकाने केलेली आहे.

दि.१५/०७/२०१९

पोलीस निरीक्षक

युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर

प्रेसनोट दि. १५/०७/२०१९

**"धुळे येथून पुणे शहरामध्ये गांजा विक्रीसाठी आलेल्या गांज्या तस्करास ०४ किलो २३६ ग्रॅम ( किं.रु.६४५००/-) गांज्यासह गुन्हे शाखा, युनिट-०४ कडून अटक".**

मा.पोलीस आयुक्त श्री.व्यंकटेशम साो,पुणे शहर यांनी पुणे शहर ड्रग्ज फ्री करणेसाठी पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेचे सर्व युनिट व सर्व पोलीस स्टेशनला अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबविणेबाबत आदेशित केलेले असून सदर आदेशाचे अनुशंगाने गुन्हे शाखा,युनिट-०४ मधील पोलीस उपनिरीक्षक श्री एन. व्ही. महाडीक ,पो.हवा.जितेंद्र तुपे, पो.हवा.गणेश साळूंके,पो.ना.निलेश शिवतरे,पो ना.रमेश चौधर,पो.ना.हनुमंत बोराटे हे दि. १३/०७/२०१९ रोजी अवैध धंदयाची माहिती काढून कारवाई करणेकामी पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पोलीस कर्मचारी रमेश चौधर व निलेश शिवतरे यांना त्यांचे बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की,एक इसम ठुबे पार्क समोर,शिवाजीनगर या ठिकाणी संशयास्पदरित्या उभा आहे,म्हणून नमुद पथकाने सदर ठिकाणी जावून खात्री केली असता सदर इसम हा पोलीस वाहन पाहून पळून जावू लागल्याने वरील पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यास पकडून त्यास त्याचे नाव पत्ता विचारता **अनिल निवृत्ती चव्हाण,वय-३२ वर्षे , रा. रावेर, पो. दयाने, ता.जि.धुळे** असे असल्याचे सांगितले असता त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचेकडील **सॅकमध्ये एकूण ४ किलो २३६ ग्रॅम वजनाचा किं.रुपये-६४५००/- रुपयाचा गांजा हा अंमली पदार्थ** मिळून आल्याने सदर इसमास मुद्देमालासह पकडून सदर इसमाविरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.३२८/२०१९ एन.डी.पी.एस ॲक्ट कलम-८(क),२०(ब)(ii)(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात असून आरोपीस अटक करण्यात आलेले आहे.सदरचा गांजा हा आरोपिताने कोठून आणला आहे व त्याची पाळेमुळे कोठे आहेत,याबाबत अधिक तपास चालू आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.अशोक मोराळे,मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.शिरीष सरदेशपांडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे-२) श्री.भानुप्रताप बर्गे ,मा.पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड,पोलीस उपनिरीक्षक श्री.निलेश महाडीक, पोलीस कर्मचारी रमेश चौधर,निलेश शिवतरे,गणेश साळूंके,हनुमंत बोराटे सर्व नेमणूक गुन्हे शाखा युनिट-०४ यांचे पथकाने केलेली आहे.

दि.१५/०७/२०१९

Bayad (PSI)

पोलीस निरीक्षक

युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर

प्रेसनोट दि. १५/०७/२०१९

**"पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयातून २ वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेला येरवडा पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुन्हेगारास युनिट-०४ कडून अटक".**

मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर यांचे आदेशान्वये गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड व पोलीस कर्मचारी पो.ना.हनुमंत बोराटे,पो.कॉ.रमेश राठोड,पो.कॉ.सागर घोरपडे हे दि. १३/०७/२०१९ रोजी पुणे पोलीस आयुक्तालयातील पाहीजे, फरारी व तडिपार आरोपीचा शोध घेणेकामी विश्रांतवाडी. पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पोलीस कर्मचारी रमेश राठोड व सागर घोरपडे यांना त्यांचे बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की,येरवडा पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील व पुणे शहर तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामधून तडीपार करण्यात आलेला गुन्हेगार नामे रविंद्र दशरथ कांबळे रा.लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे हा कळस पेट्रोलपंपासमोर,विश्रांतवाडी या ठिकाणी एका टपरीजवळ कोणाचीतरी वाट बघत थांबलेला आहे,म्हणून सदर बातमीची खात्री करण्यासाठी वरील अधिकारी व कर्मचारी यांनी समक्ष जावून खात्री असता तडीपार इसम हा **रविंद्र दशरथ कांबळे,वय-३२ वर्षे,रा.लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे** हा कळस पेट्रोलपंपासमोर,विश्रांतवाडी हा थांबलेला दिसून आल्याने व वरील स्टाफला पाहून पळून जाण्याचे तयारीमध्ये असताना वरील पथकाने त्यास १८.०० वा.जागीच ताब्यात घेवून सदर आरोपीविरुध्द विश्रांतवाडी पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा रजि नं-२४६/२०१९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम-१४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.अशोक मोराळे,मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.शिरीष सरदेशपांडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे-२) श्री.भानुप्रताप बर्गे,मा.पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड,पोलीस कर्मचारी रमेश राठोड,सागर घोरपडे व हनुमंत बोराटे यांचे पथकाने केलेली आहे.

दि.१५/०७/२०१९

पोलीस निरीक्षक

युनिट-०४,गुन्हे शाखा,पुणे शहर